ISSN- २०-२१ मोसम काल

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - III JULY - SEPTEMBER - 2020

ENGLISH / MARATHI PART - II

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

TRUE COPY

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.), M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
...KARRAO JAGTAP ARTS & COMMERCE COLLEGE, WAGHOLI
Tal-Koregaon, Dist-Satara.

## CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | शोधनिबंध आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | अण्णाभाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान<br>डॉ. गंगणे जीवन सुदामराव | १-५ |
| २ | सत्यशोधकीय विचारवंत अण्णाभाऊ साठे<br>प्रा. डॉ. सावंत जे. सी. | ६-९ |
| ३ | साहित्यिक अणाभाऊ साठे यांचे योगदान<br>डॉ. उर्मिला क्षीरसागर | १०-१४ |
| ४ | अण्णाभाऊ साठे यांच्या निवडक कथात्मक साहित्यातील स्त्री चित्रण<br>प्रा. डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते | १५-२१ |
| ५ | आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावाद संघर्ष आणि स्थानिक इतिहासाचे वास्तववादी चित्रण<br>प्रा. डॉ. वंदना रा. लोंढे | २२-२५ |
| ६ | खिरविरे येथील सावकारांच्या वह्यांची होळी (७ नोव्हेंबर १९४९)<br>डॉ. गणेश शंकर विधाटे | २६-२८ |
| ७ | दुसऱ्या महायुद्धातील यशवंत घाडगे यांची कामगिरी<br>किरण गणपत कुंभार | २९-३१ |
| ८ | प्रजाहितदक्ष जयसिंगराव घाटगे<br>राजेंद्र मा. घाडगे | ३२-३६ |
| ९ | घारापुरी लेणीचा एक ऐतिहासीक अभ्यास<br>डॉ. भानुदास धोंडिबा शिंदे | ३७-४१ |
| १० | डॉ. संजीवनी सतीष केळकर यांचे कार्य<br>डॉ. एस. एन. गायकवाड | ४२-४५ |
| ११ | उत्तर पेशवेकालीन तुरुंग व्यवस्था<br>प्रिया व्रिजेश कुलकर्णी | ४६-४८ |
| १२ | शेतकऱ्यांच्या व्यथा व महात्मा फुले यांचे उपाय<br>प्रा. कोकाटे अनिल दत्तात्रय | ४९-५२ |


TRUE COPY

I

PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS &
COMMERCE … LEGE, WAGHOLI
Tal-Kor… …Satara.

VOLUME - IX, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २. सत्यशोधकीय विचारवंत आण्णाभाऊ साठे

प्रा. डॉ. सावंत जे. सी.
शंकरराव जगताप आर्ट्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली, ता. कोरेगांव, जि. सातारा.

सत्यशोधक ही एक वैचारिक परंपरा आहे. या परंपरेचे महात्मा जोतीराव फुले हे निर्माते असून त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज व सत्यशोधक चळवळीतून एका नव्या समाजाचा अभ्युदय झाला. भारताला फार मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. प्राचीन काळापासून भारतात राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अशी यांचा विकास झाला. मात्र या विकासात सामाजिक वर्गवारी महत्त्वपूर्ण झाली. भारत खेड्यांचा देश आहे असे संबोधले जाते. आणि ही खेडी प्राचीन कालापासून स्वयंपूर्ण होती असे मानतात. एवढेच नव्हे तर आपल्या भारतीय इतिहासाची मांडणी करत असताना आपली खेडी स्वयंपूर्ण कशा प्रकारे होती याचे विवेचन अत्यंत उत्कृष्टरित्या करण्यात येते. मात्र या स्वयंपूर्णतेच्या पाठीमागे अशी सामाजिक वर्गवारी होती की ज्या वर्गवारीमध्ये कोणत्याही वर्गातील व्यक्तींना आपला वर्ग बदलून वरिष्ठ वर्गात पात्रता असूनही जाता येत नसे. जर कोणी असा प्रयत्न केला तर त्याला जातीबहिष्कृत करण्यात येत असे. अशा या सामाजिक व धार्मिक बंधनात अडकलेल्या समाजात सर्वप्रथम सत्यशोधक दृष्टी बाळगण्याचे कार्य गौतम बुद्धांनी केले. ज्या परंपरेत बहुसंख्य स्त्रियांना व शूद्रांना अस्पृश्य ठरविले होते. 'बहुजन हिताय-बहुजन सुखाय' अशी घोषणा करून सर्वप्रथम बुद्धांनी असमतेच्या रूढी-परंपरांच्या जोखडातून समाजाची मुक्तता केली. अशा लोकांच्या मुक्तीची चळवळ म्हणजे सत्यशोधक चळवळ असे ढोबळ मानाने म्हणता येईल.

TRUE COPY

सत्यशोधक विचारांचा मागोवा घेतला असता काही प्रमुख गोष्टी आपणासमोर येतात. गौतम बुद्ध, महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर हे सत्यशोधक परंपरेतील आहेत. या प्रत्येक महापुरुषाने आपला स्वतःचा ठसा उमटवलेला आहे. गौतम बुद्धांनी धार्मिक क्षेत्रात क्रांती केली आणि धार्मिक क्षेत्रात आपला स्वतःचा एक नवा प्रवाह सुरू केला. महात्मा फुल्यांनी विशेषतः सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात क्रांती केली आणि तिथून पुढे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात एक नवीन प्रवाह निर्माण झाला. डॉ. आंबेडकरांनी मुख्यत्वे राजकिय क्षेत्रात क्रांती केली आणि भारताच्या राजकिय क्षेत्रात एक नवा आंबेडकरी प्रवाह सुरू झाला. अगदी याचप्रमाणे आण्णा भाऊ साठे यांनी साहित्य आणि लोककलेच्या क्षेत्रात नवा विचारप्रवाह प्रवर्तित केला. आण्णा भाऊ साठे या सत्यशोधक परंपरेचे पाईक ठरतात. आण्णाभाऊंचे एकूण साहित्य आणि त्यांची विचारधारा पाहिली असता, आण्णा भाऊ साठे हे सत्यशोधक विचारपरंपरेतील ठरतात. अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनाचे चार टप्पे आहेत. वारणेच्या खोऱ्यात डोंगर-रानात वाढणारे भाऊ, दुसरा टप्पा म्हणजे वाटेगाव येथून मुंबईत चालत आलेले व पोटापाण्यासाठी नोकरी



PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS &
COMMERCE COLLEGE, WAGHOLI
Tal. Koregaon, Dist. Satara.